# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

मुख्य संपादक : अजश भांगे

● बीड/महाराष्ट्र ● सोमवार दि.३ मार्च २०२५ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-१२७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


## महायुती सरकारला त्यांच्याच मंत्र्यांनी आरसा दाखवला-विजय वडेट्टीवार

**मुंबई**-पोलिस सुरक्षा असताना केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीची छेड काढल्याची ही बातमी महाराष्ट्रातील वास्तव असल्याची टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. तसेच महायुती सरकारला त्यांच्याच मंत्र्यांनी आरसा दाखवला आहे. आता तरी मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांना जाग येणार का? असा सवालही विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.मुक्ताईनगर तालुक्यातील कोथळी येथील जत्रेत रक्षा खडसे यांच्या मुलीची काही टवाळखोरांकडून छेड काढण्यात आली होती. यावेळी टवाळखोरांकडून त्यांचे व्हिडिओ देखील काढण्यात आले. या संशयावरून त्यांनी या तरुणाच्या हातामधील मोबाईल घेऊन त्याची पडताळणी केली. या घटनेचा राग येऊन चारही टवाळखोरांनी सुरक्षा रक्षकासोबत झटापट केली. याप्रकरणी रक्षा खडसे यांनी मुक्ताईनगर पोलिस ठाण्यात जाऊन तरुणांना अटक करण्याची मागणी केली आहे.अटक करण्याची मागणी केली आहे.पोलिस सुरक्षा असताना केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीची छेड काढल्याची ही बातमी महाराष्ट्रातील वास्तव आहे. पोलिस सुरक्षा असताना केंद्रीय मंत्र्यांच्या मुली आज महाराष्ट्रात सुखरूप नाही तिथे शेतात, नोकरीवर जाणाऱ्या सामान्य आई वडिलांच्या मुली दररोज स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी काय 'स्ट्रगल' करत असतील आणि किती मानसिक त्रास त्यांना सहन करावा लागत असेल हा अंदाज महायुतीतील मंत्र्यांना नाही, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले.

# धनंजय मुंडेंचा बीड प्रकरणात संबंध नाही: पण आरोपी जवळचा होता

## नीतिमत्तेच्या आधारावर त्यांनी राजीनामा द्यायला पाहिजे-रामदास आठवले

**नाशिक (वृत्तसंस्था)**

मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची सध्या चर्चा सुरू आहे. अंजली दमानिया यांनी देखील धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यासाठी सोमवारपर्यंत अल्टीमेटम दिला आहे. सोमवारपर्यंत धनंजय मुंडेंचा राजीनाम न घेतल्या पेटून उठू, असा इशारा अंजली दमानिया यांनी दिला. तर करुणा मुंडे यांनी तर ३ मार्च रोजी धनंजय मुंडेंचा राजीनामा होईल, असा दावाच केला. यावर केंद्रीय मंत्री यांनी प्रतिक्रिया दिली. मस्साजोगचे संतोष देशमुख हत्या प्रकरणी धनंजय मुंडे यांनी नैतिकतेच्या आधारे राजीनामा द्यायला पाहिजे, असे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी म्हटले आहे. अजितदादांनी याबाबत विचार करणे आवश्यक असल्याचेही आठवले म्हणाले. ते नाशिक येथे माध्यमांशी बोलत होते.

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख् हत्या प्रकरणी सीआयडीने १५०० पेक्षा जास्त पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराड हाच या हत्येमागचा मास्टरमाइंड असल्याचा दावा आरोपपत्रात करण्यात आला आहे. वाल्मीक कराडला मुख्य सुत्रधार म्हटल्याने धनंजय मुंडे यांच्या अडचणी वाढल्या आहेत. धनंजय मुंडे यांनी राजीनाम द्याव अशी मागणी जोर धरत आहे. विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. महायुतीच्याही काही नेत्यांकडूनही धनंजय मुंडेंचा राजीमाना घ्यावा, अशी मागणी होत आहे. यामुळे धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत राजकीय दबाव वाढत आहे.

करुणा मुंडे आणि धनंजय मुंडे यांचे काय संबंध आहेत हे सगळ्यांना माहिती आहे. करुणा मुंडे यांना माहिती मिळाली असेल तर मला त्याबद्दल माहिती नाही. एक गोष्ट खरी आहे की, वाल्मिक कराडच्या सांगण्यावरून संतोष देशमुखचा मर्डर केल्याची सगळी माहिती सीआयडीला मिळाली, असे रामदास आठवले म्हणाले.मला असे वाटते की, धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांचा मोठ्या प्रमाणात जवळचा संबंध होता. पण, या कोणाशी काही संबंध नसेल असे काय पुरावेही नाही. परंतु धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा ही मागणी आहे. अजितदादांनी याबाबत विचार करणे आवश्यक आहे. खुनाच्या प्रकरणामध्ये धनंजय मुंडे यांचा कसलाही संबंध नाही. पण, खुनातील आरोपी जवळचा होता. नीतिमत्तेच्या आधारावर धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यायला पाहिजे, अशी मागणी रामदास आठवले यांनी केली.धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत अजितदादा पवार यांनी निर्णय घेतला पाहिजे, असेही त्यांनी म्हटले. संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि सोमनाथ सूर्यवंशी या प्रकरणावर धनंजय मुंडे यांची भूमिका दुटप्पी असल्याचे देखील रामदास आठवले म्हणालेत.रामदास आठवले यांनी रक्षा खडसे यांच्या मुलीच्या छेडछाड प्रकरणावरही प्रतिक्रिया दिली. रक्षा खडसे यांच्या मुलीची छेड काढण्याचा प्रयत्न केला असेल ही बाब गंभीर असल्याचे ते म्हणाले या प्रवृत्ती ठेचून काढायला सर्वांनी एकत्र काम केले पाहिजे. रक्षा खडसे यांच्या मुलीची छेड काढणे ही अत्यंत अयोग्य बाब आहे. तक्रार दिल्यानंतर आरोपी पकडले जातील. विरोधकांचे म्हणणे खरे असले तरी याच्यात राजकारण करण्याची गरज नाही. पोलिसांनी ऍक्टिव्ह राहणे महत्त्वाचे आहे. कायदे असले तरी सुद्धा समाजामध्ये कायदे मोडणारे असंख्य लोक आहेत, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.



## कोळगाव अतिक्रमनात राजकीय पुढाऱ्यांचा हस्तक्षेप, पालक नाराज

**श्रीगोंदा । गणेश गाडेकर**



कोळगाव येथील अतिक्रमनाचा मुद्दा हा कळीचा मुदा ठरताना दिसून येत आहे सविस्तर वृत्त असे कि कोळगाव येथील अतिक्रमन हटविण्यासाठी काही दिवसा पूर्वी नोटीसा आल्या असून अतिक्रमन धारकांचे चांगलेच धाबे दनानले असून यासाठी राजकीय पुढारी व अनधिकृत व्यवसायिक यांच्या बैठक होताना दिसत आहेत यातच हे अतिक्रमण वाचवण्यासाठी काही राजकीय पुढारी हे पुढाकार घेऊन प्रयत्न करताना दिसत आहेत परंतु यात या अतिकरणा मुळे शाळकरी मुलांला व जास्त करून मुलींला होणारा त्रास या अतिक्रमन हटल्याने सुटणार होता परंतु हे होताना दिसून येत नाही त्यामुळे शाळकरी मुलींचे पालक हे नाराज असून त्यांच्या रोशास सामोरे जावे लागणार आहे पालकांचे असे म्हणणे आहे कि या अतिक्रमना मुळे आमच्या मुलांला व मुलींना शाळेत जाण्यासाठी रस्ता नव्हता तेव्हा हे पुढारी मूग गिळून बसले प्रशासन आपले काम करत असताना वयक्तिक फायद्यासाठी पुढारी एक होताना दिसत आहेत गावच्या भविष्या साठी एक होत नाहीत परंतु आमच्या मुलांसाठी आम्ही सक्षम आहोत कधी या अतिक्रमना मुळे आमच्या मुलांला अडचण निर्माण झाली तर या पुढच्यांचेही राजकीय अस्तित्व मिटवण्याची भूमिका मतपेटिटून दाखून देण्याची भूमिका काही पालकांनी दाखवली आहे.

> कोळगाव मध्ये पुढारी हे विकास कामात एकत्र दिसत नाहीत, मुली शाळेत जाताना याच अतिक्रमन गाळ्यात काही टवाळ मुलं रस्त्यावर गाडी लावून टवाळ पणा करतात त्यावेळी हे पुढारी जातात कुठे, गावात अवेद्य दारू, गुठखा, इतर व्यसनधिन पदार्थ विक्री होतात याकडे लक्ष दयावे, चुकीच्या गोष्टीला पाठबळ देणारे लक्षात असुद्या तुम्हाला पुढारी करणारे हेच पालक आहेत, काष्टीच्या बड्या नेत्यांनी कोळगाव च्या विद्यार्थ्यांना त्रास होईल असे वागू नये अन्यथा मतांचा टक्का घसरेल – संतप्त पालक

## सात वर्षीय मिरान शेख मुबशिरुद्दीन शेख याने ठेवला पहिला रोजा-कुटुंबात आनंदाचे वातावरण

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

खुलताबाद: पवित्र रमजान महिन्यात रोजा ठेवण्याला विशेष महत्त्व आहे. मुस्लिम समाजामध्ये लहान मुलांचा पहिला रोजा (रोजा-ए-अवल) हा खास आनंदाचा क्षण मानला जातो. अशाच एका आनंददायी प्रसंगानिमित्त, खुलताबाद येथील मिरान शेख मुबशिरुद्दीन शेख (वय ७ वर्षे) याने आज आपला पहिला रोजा पूर्ण केला.



सकाळी सुर्ययापूर्वी सहरी करून त्याने उपवास सुरू केला आणि संध्याकाळी इफ्तारच्या वेळी तो पूर्ण केला. दिवसभर न खाता-पिता संयम ठेवून त्याने आपला पहिला उपवास पाळला. या विशेष क्षणानिमित्त कुटुंबीय व नातेवाईकांनी त्याचे भरभरून कौतुक केले आणि आनंद व्यक्त केला. या प्रसंगी मिरान शेख मुबशिरुद्दीन शेख यांच्या कुटुंबातील सदस्यांनी सांगितले की, लहान वयात त्याने श्रद्धेने आणि उत्साहाने पहिला रोजा पूर्ण केला आहे, याचा आम्हाला खूप अभिमान वाटतो. अल्लाह त्याला आयुष्यात यश आणि आरोग्य देवो, अशी आमची प्रार्थना आहे. या शुभ प्रसंगी कुटुंबीय, मित्रपरिवार आणि समाजातील मान्यवरांनी त्याला शुभेच्छा दिल्या आणि उज्वल भविष्यासाठी दुवा मागितली.

## गोकुळ शिशुवाटिकेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

दीनदयाल शोध संस्थान संचलित गोकुळ शिशु वाटिकेत वार्षिक २०२४-२५ स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. सर्वप्रथम दीनदयालजी उपाध्याय व भारतरत्न नानाजी देशमुख व नटराज्याच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. शाळेच्या सचिव डॉ.सीमाताई जोशी यांनी प्रास्ताविक केले. तसेच गोकुळचे वार्षिक अहवाल लेखन सौ मधुरा ताई गुळवेलकर यांनी केले. प्रमुख पाहुण्या म्हणून आलेल्या चिंचोलकर ताईने मुलांना व पालकांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप गोकुळ समिती सदस्य अँड.अर्चनाताई तुंगार यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात ओ माय फ्रेंड गणेशा या गणेश वंदनाने झाली. त्यानंतर दीनदयाल शोध संस्थांच्या कार्यकर्त्यांनी बच्चे मन के सच्चे या गाण्याचे सादरीकरण केले. या कार्यक्रमात विविध प्रकारच्या गाण्यांचे नृत्य होते त्यात कोळीगीत, माऊली माऊली, शेतकरी गीत, आरंभ हे प्रचंड भांगडा गीत, चांद तारे, टन टन घंटी बजे,देशभक्तीपर गीत, चिऊताई चिऊताई, छोटे छोटे तमाशे इत्यादी वेगवेगळ्या गाण्याचे प्रदर्शन करण्यात आले. २०२४-२५ वर्ष हे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० जन्मशताब्दी वर्ष असल्यामुळे अहिल्याबाई होळकरांचे पण गाण्यावर सादरीकरण करण्यात आले. शिवकालीन सादरीकरण लाठीकाठी व तलवारबाजी देवराज गुळवेलकर या प्रल्हाद गटातील विद्यार्थ्यांनी सादर केले. तसेच राजमुद्रा मृणाल पवार हिने सादर केली. शिवगर्जना श्रीपाद रत्नपारखी याने सादर केले. अशाप्रकारे विविध सादरीकरणातून कार्यक्रम उत्साहात घेण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितलताई कुलकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन सौ स्वातीताई देशपांडे यांनी केले. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन गोकुळ समिती सदस्य माननीय गंगाधर जी देशमुख सर, सुनंदाताई कुलकर्णी, रवींद्र देशमुख सर ,दहिवाळ सर, व तसेच नानाजी देशमुख विद्या मंदिर मुख्याध्यापिका अर्चनाताई मोराळे व गोकुळ शिशुवाटिका प्रमुख सौ स्नेहलताई देशपांडे यांनी केले. या कार्यक्रमाला सहकार्य दीनदयाल शोध संस्थानचे सर्व कार्यकर्ते व कर्मचारी यांचे लाभले.



## न्यायालयीन वकील कर्मचारी भीम जयंती अध्यक्षपदी ऍड.विनायक जाधव

**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ व्या जयंती महोत्सव मोठ्या हर्ष उत्सवात साजरी करण्यासाठी बीड येथील सर्व वकील बंधू-भगिनी आणि कर्मचारी यांची बैठक दिनांक एक मार्च २०२५ रोजी ज्येष्ठविधीज्ञ ऍड.बाळासाहेब बाहेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली होऊन २०२५ भीम जयंती उत्सव समिती कार्यकारणी जाहीर करण्यात आली या कार्यकारणी मध्ये सर्वानुमते पदाधिकाऱ्याची निवड करण्यात आली,

अध्यक्ष ऍड.विनायक जाधव उपाध्यक्ष ऍड.राईस पठाण सचिव ऍड.प्रवीण सेम सरचिटणीस ऍड. यासेर पटेल कार्याध्यक्ष ऍड.सुभाष पिसोरे सहसचिव ऍड.श्रीकांत जाधव कोषाध्यक्ष ऍड.गोरक्ष खेडकर महिला प्रतिनिधी ऍड.रेखा वडमारे याप्रमाणे कार्यकारी निवडण्यात आली तसेच उत्कृष्ट भीम जयंती साजरी करण्यासाठी वेगवेगळे उस्तव समिती स्थापन करण्यात आली,

मोटार सायकल बंधुभाव रॅली प्रमुख ऍड.राहुल साळवे व्याख्यान समिती व सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख ऍड.रोहिदास येवले प्रसिद्धीप्रमुख ऍड.विलास जोशी तर मार्गदर्शक म्हणून ऍड.वसंत वडमारे, ऍड. के.एस. पंडित ऍड.भीमराव चव्हाण ऍड.शिवाजी साळवे ऍड.नितीन वाघमारे ऍड.अविनाश गडगे ऍड.राजन साळवी ऍड.सतीश सोनवणे ऍड.फिडेल चव्हाण ऍड.शिवाजी कांबळे ऍड.राजू शिंदे ऍड.शिवाजी झिंजुर्डे ऍड.काकासाहेब सोनवणे ऍड.अशोक वाघमारे

यांची नियुक्ती करण्यात आली बैठकीत शेवटी आभार प्रदर्शन ऍड.पंकज रायबोळे यांनी केले.





## मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भेटणार-वर्षा जगदाळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर बकाल करणाऱ्या मुख्याधकारी नीता अंधारे यांना सर्व सामान्य नागरिकांच्या मूलभूत प्रश्नाकडे लक्ष देण्यासाठी वेळ नसून घरात बसून बोगस कामांचे बिल (सिविल ) काढण्यात त्या मग्न असून शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे . शहराला पंधरा दिवस आड पाणी येत आहे यातच शहरातील प्रमुख भागातील पथदिवे बंद आहेत याकडे गांभीर्याने न पाहता फक्त जिथून मलिदा मिळेल तिथेच काम करण्यावर भर देणाऱ्या नीताअंधारे यांच्या भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांना भेटून सखोल चौकशीची मागणी करणार असल्याचे पत्रक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी काढले आहे आहे.

बीड नगरपरिषद प्रशासनाच्या विरोधात अनेक संघटना पक्ष व सामान्य नागरिकांनी आवाज उठवलेला आहे मात्र याकडे मुख्याधिकारी नीता अंधारे यांचे साफ दुर्लक्ष असून नगरपालिकेत आठवड्यातून एकदाच येणाऱ्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांना सर्वसामान्य लोकांच्या कामाचे कसलेही सोयीसुतक नसून शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे तर पिण्याचे पाणी हे १५ ते २० दिवस आड येत आहे यासह शहरात मोकाट जनावरांचा प्रश्नही मोठा असून मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी पदभार घेतल्यापासून शहरात एकही सार्वजनिक महिलांच्या शौचालयाच बांधले नसून मुख्याधिकारी नीता अंधारे या जाणून बजून मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष करत आहेत. मुख्याधिकारी नीता अंधारे या आपल्या घरातच नगरपालिका प्रशासनाचा कारभार पाहतात शहरातील विविध विकास कामांचे बोगस बिले काढण्यात मुख्याधिकारी नीता अंधारे मग्न असून सर्वसामान्यांच्या प्रश्नाचे त्यांना काहीच महत्त्व राहिले नसल्याने अशा भ्रष्ट अधिकाऱ्याची चौकशी करून निलंबित करण्याची मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे करणार असल्याचे मनसेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.



## संपादकीय..

# शपथ घेऊन कॉपीमुक्त परीक्षा होणार का?



तज्ज्ञ व पात्रताधारक शिक्षक असून सुद्धा विद्यार्थ्यांना खासगी शिकवणीची गरज आहे का? याचा विचार होणे आवश्यक आहे. त्यात कायम विना अनुदान शाळांचे वाढते प्रमाण ते सुद्धा पात्रता असून तुटपुंजा पगारावर शिक्षकसेवक म्हणून सेवा करावी लागत असली तरी त्यांना भविष्याची चिंता कायम आहे. पात्रता समान असली तरी कायमस्वरूपी शिक्षकाला रुपये पन्नास हजारांपेक्षा जास्त पगार आणि त्याच ठिकाणी कंत्राटी शिक्षक म्हणून ग्रामीण भागात रुपये चार हजार पगार दिला जातो. तो सुद्धा वेळेवर मिळत नाही. आजच्या परिस्थितीचा अभ्यास केल्यास प्राथमिक विभाग ते पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रुपये चार हजार ते रुपये तीन लाखांपेक्षा जास्त पगार घेणारे अध्यापक आहेत. तरीपण असे प्रकार कसे होतात याचा सखोलपणे अभ्यास होणे आवश्यक आहे. तरच खऱ्या अर्थाने कॉपीमुक्त परीक्षा होतील.महाराष्ट्र राज्यातील दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा कॉपीमुक्त होण्यासाठी कॉपीमुक्त अभियान राबविण्याचा एक चांगला निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतला आहे. कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी परीक्षा सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी परीक्षेत कॉपी न करण्याची शपथ घेतली आहे. कॉपीमुक्त अभियानाचा मूळ उद्देश विद्यार्थ्यांमध्ये कॉपी न करण्याची सवय निर्माण करणे होय. एक चांगले पाऊल आपल्या राज्यातील शिक्षण मंडळाने घेतले आहे असेच म्हणावे लागेल. मात्र त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्यासाठी केवळ विद्यार्थी नव्हे तर अध्यापक व पालकांनी या कॉपीमुक्त अभियानात सहभागी व्हावे. तरच राज्यात कॉपीमुक्त अभियान यशस्वी होईल.

अलीकडच्या काळातील परीक्षांचा विचार केल्यास परीक्षेतील गैरप्रकार थांबविण्यासाठी कॉपीमुक्त अभियान का राबविण्यात आले याचा विचार होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्यावतीने आपल्या राज्यात नऊ विभागीय मंडळामार्फत दहावी आणि बारावीच्या परीक्षा घेतल्या जातात. फेब्रुवारी-मार्च २०२५ ची बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून सुरू झाली असून दहावीची (२१ फेब्रुवारी) परीक्षा कालपासून सुरू झाली आहे. बारावीच्या पहिल्या पेपरला राज्यात कोकण, मुंबई व कोल्हापूर विभाग सोडून इतर सहा विभागांत ४२ केंद्रांवर विद्यार्थ्यांनी कॉपी केल्याचे प्रकार घडले आहेत. आतापर्यंत सर्वात जास्त कॉपी केस छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) विभागामध्ये झाले आहेत. मग सांगा कॉपीमुक्त अभियानाचे झाले काय? अशावेळी ताबडतोब कारवाई होणे आवश्यक आहे. जी कारवाई केली असेल त्याला वर्तमानपत्रांमध्ये ठळकपणे प्रसिद्धी दिली पाहिजे. म्हणजे असे प्रकार पुढे होणार नाहीत.महत्त्वाची बाब म्हणजे महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा सुरू आहेत. त्यासाठी परीक्षा कॉपीमुक्त होण्यासाठी विद्यार्थ्यांना कॉपी न करण्याची शपथ घेण्यात आली असून कॉपी प्रकरणे उघडकीस आली आहेत. म्हणजे कॉपीमुक्त अभियानाचा नेमका अर्थ काय? याचा विचार राज्यातील सुजाण नागरिकांनी करणे गरजेचे आहे. परीक्षेच्या अगोदर परीक्षा मंडळाच्या आदेशानुसार दहावी आणि बारावीच्या बोर्डच्या परीक्षेत परिपूर्ण अभ्यास करूनच सामोरे जाईन असे वचन परीक्षार्थीने घेतले आहे. मी उत्तीर्ण होण्यासाठी परीक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करणार नाही किंवा परीक्षेपूर्वी गैरमार्गाचा विचारही करणार नाही. जर कोणी गैरमार्गाचा विचार करत असेल तर त्यास गैरमार्गापासून परावृत्त करेन असे वचनबद्ध विद्यार्थी झाले आहेत. तसेच परीक्षेला सामोरे जाताना परीक्षा मंडळाच्या सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे वचन घेतले आहे. त्याचप्रमाणे मी सातत्याने अभ्यास करेन व प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करेन.परीक्षेमध्ये आत्मविश्वासाने, निर्भीडपणे, तणावविरहित सामोरे जाईन व चांगल्या गुणाने उत्तीर्ण होऊन माझ्या शाळेचे, आई-वडिलांचे व गुरुजनांचे नाव उज्ज्वल करेन, अशी शपथ प्रत्येक विद्यार्थ्यांनी घेतली आहे. कॉपीमुक्त अभियानाचा विचार करता विद्यार्थ्यांनी शपथ घेतल्यास त्यांचे भवितव्य उज्ज्वल होईल, असे परीक्षा मंडळाला वाटते. तसेच परीक्षा तणावरहित वातावरणात पार पाडता येतात. कॉपीमुक्त अभियानामुळे विद्यार्थ्यांना कॉपी प्रतिबंध अधिनियमाबद्दल माहिती मिळाल्याने ते जागरूक होऊन अभ्यास करून अधिक उत्साहाने परीक्षेला सामोरे जाऊ शकतात. तेव्हा परीक्षेच्या कालावधीत शाळा परिसरात कॉपीमुक्त घोषवाक्याने जनजागृती फेरी काढण्यात यावी. गावची ग्रामसभा घेऊन कॉपीमुक्त अभियानाबाबत माहिती द्यावी. तसेच कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी ग्रामस्थांना आव्हान करून राज्यातील कॉपीमुक्त अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले पाहिजे ही आजच्या काळाची खरी गरज आहे. अगदी शालांत परीक्षा ते स्पर्धा परीक्षा यांचा विचार करता या परीक्षा सुरू झाल्यावर कॉपी झाल्याचे वर्तमानपत्रामध्ये वाचायला मिळते. आज दहावी आणि बारावीच्या परीक्षा मंडळाने कॉपीमुक्त अभियान राबवून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली आहे. मात्र विद्यार्थी कॉपी का करतात याचा सुद्धा विचार होणे आवश्यक आहे. याचा विचार झाला असता तर आज शपथ घेण्याची वेळ विद्यार्थ्यांवर आली नसती. परीक्षेचे सोडा आज विद्यार्थ्यांसाठी साद घालत आहेत शाळा असे चित्र दिसत आहे.तेव्हा अभ्यास वेळच्या वेळी करायचा नाही, नंतर पास होण्याचा झटपट उपाय म्हणजे परीक्षेत कॉपी करायची. यामुळे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांवर एकप्रकारे अन्याय होत असतो. तेव्हा ही जी प्रवृत्ती आहे तिचा नायनाट केला पाहिजे. त्यासाठी असे विद्यार्थी का करतात याचा शोध लावणे गरजेचे आहे. कॉपीमुक्त अभियान दरम्यान दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त अभियान पार पाडण्यासाठी आता जरी शपथ घेण्यात आली, जनजागृती करण्यात आली, घोषवाक्ये लिहिण्यात आली, तरी कॉपीमुक्त परीक्षा होणार का? या प्रश्नाचे उत्तर १७ मार्चनंतर मिळेल.

## काळेगाव येथे रिपाईच्या शाखेचे उत्साहात अनावरण

# संदीपान तात्या हजारे यांच्या उपस्थितीत असंख्य कार्यकर्ते एकवटले



**केज । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया केज च्या वतीने काळेगाव तालुका केज जिल्हा बीड येथे शाखेचे अनावरण रिपब्लिकन पार्टी इंडिया चे जिल्हा कार्याध्यक्ष उद्घाटक द रियल पँथर नेते माननीय संदिपान जी हजारे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलताना म्हणाले हे काळे गाव म्हणजे पँथरचा बाले किल्ला आहे येथे आमची जुनीच पँथरची शाखा होती आणि मी त्यावेळी त्यांच्या सुखदुःखात धावून जात होतो आणि इथे रिपाईची राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर रामदासजी आठवले साहेब केंद्रीय राज्यमंत्री भारत सरकार यांनी पण काळेगावला भेट दिली आहे आणि आत्ता पण जुन्या पँथरणे शाखा उघडली याचा मला आनंद झाला आहे ते पुढे बोलताना म्हणाले की काळेगाव चे कार्यकर्ते चे पाठीशी खंबीरपणे उभा राहील आणि मी माझे कार्यकर्त्याला न्याय देईल असे रिपाईचे जिल्हा कार्याध्यक्ष यावेळी म्हणाले तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष केज रिपाईचे तालुका अध्यक्ष सुनील हिरवे म्हणाले की रिपब्लिकन पक्ष म्हणजे देशासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे संविधान निर्माते डॉक्टर बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांचा हा पक्ष आहे आणि या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर रामदासजी आठवले साहेब देशाचे केंद्रीय राज्यमंत्री भारत सरकार यांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ची शाखेचे अनावरण काळेगाव मध्ये झाले यानंतर प्रत्येक वाड्या वस्त्या वर गावांमध्ये जाऊन रिपाई शाखेचे उद्घाटन करणार आहे आणि रिपाई चे कार्यकर्त्याला न्याय देण्यासाठी मी सदैव प्रयत्न करणार आहे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. मनोज धिवार साहेब तसेच मराठा आघाडीचे जिल्हा अध्यक्ष नवनाथ नरसो तपसे रिपाईचे तालुका उपाध्यक्ष देवानंद वाघमारे अंगद शिनगारे रिपाई केज कोश अध्यक्ष रिपाईचे के शहर अध्यक्ष सचिन ठोकळ शहर उप अध्यक्ष अमोल मस्के काळेगाव शाखा चे नवनिर्वाचित अध्यक्ष विश्वजीत उर्फ दादा कृष्णा धीवार अध्यक्ष बाळासाहेब जेजरत धिव सचिव मोतीराम धीवर सहसचिव धम्मपाल नरहरी धिवार कोषाध्यक्ष आनंद नरहरी धिवार संघटक अमोल दत्तात्रय दिवार सह संघटन अशोक तुकाराम धिवार संरक्षण प्रमुख अक्षय अशोक धिवार या सर्वांचे प्रमुख मार्गदर्शक शरद धिवार मधुकर धिवार प्रमोद धिवार इत्यादी उपस्थित होते.

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांचा बीड जिल्हा दौरा

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून संपर्क नेते माननीय सुनील प्रभू साहेब मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर साहेब उपनेत्या माननीय सुषमाताई अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांचा बीड जिल्हा आढावा दौरा दिनांक ४ मार्च २०२५ ते ६ मार्च२०२५ दरम्यान आयोजित केला आहे तरी दिनांक ६ मार्च२०२५ रोजी सकाळी ११ वाजता परळी दुपारी १ वाजता अंबाजोगाई दुपारी ३ वाजता केज येथे शिवसेना महिला आघाडी युवा सेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित केली असुन सदरील बैठकीला लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील दादा धांडे सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे उपस्थित राहणार आहेत तरी महिला आघाडी जिल्हा प्रमुख युवा सेना जिल्हा प्रमुख सह सर्व उपजिल्हाप्रमुख तालुका प्रमुख शहर प्रमुख उपतालुकाप्रमुख शाखा प्रमुख गटप्रमुख बुथ प्रमुख महिला आघाडी युवा सेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी बैठकीत उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना बीड जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांनी केले आहे.



# शेतकऱ्यांच्या राज्यासाठी...!



ग्राहकांपर्यंत आर्थिक सेवा आणि उत्पादने मोबाइल द्वारे वितरीत करणाऱ्या तंत्रज्ञानाला 'फीनटेक' म्हटल जात. हल्ली बँकेचे जवळपास सर्व आर्थिक व्यवहार देखील मोबाइल ॲप एका क्लिक वर होऊ लागले आहेत. आता बँक म्हटले की लोकांकडून ठेवी जमा करणारी आणि त्यातून नफा कमावणारी संस्था असा आपला समाज आहे. पण एक बँक अशीही आहे की जी शेतकऱ्यांच्या भल्यासाठी स्थापन झाली आहे. ही बँक दुसऱ्यांकडून निधी गोळा करते आणि त्याची गुंतवणूक कृषी उद्योग आणि शेतकऱ्यांमध्ये करते या स्टार्टअपचे नाव आहे 'रूट कॅपिटल.'रूट कॅपिटल ही विनानफा तत्वावर चालणारी एक कृषी कर्जवाटप संस्था आहे. ती मुख्यत्वे कृषीसंस्थांमध्ये गुंतवणूक करते. या संस्था छोट्या शेतकऱ्यांकडून पिके खरेदी करतात आणि मोठ्या कंपन्यांना विकतात. आफ्रिका, दक्षिण अमेरिका आणि आशियाच्या अविकसित भागांमधील कृषीसंस्था आणि शेतकऱ्यांना वित्तपुरवठा करण्याचे काम रूट कॅपिटल करते. तिची विशेषता म्हणजे जे शेतकरी माध्यम वर्गाच्या गटात मोडतात ते छोटे कर्ज मिळवण्यासाठी अपात्र मानले जातात आणि त्याच वेळी व्यावसायिक बँकांच्या मोठे कर्ज देण्याच्या निकषांमध्येही बसत नाहीत आशा शेतकऱ्यांना ती मदत देते.ग्रामीण समृद्धीला चालना देण्यासाठी कृषी उद्योगांना स्वस्त व माफक दरात वित्तपुरवठा उपलब्ध करून देण्याचे व्रत अंगीकारून या स्टार्टअपने १९९९मध्ये जे इवलेसे रोपटे लावले होते त्याचा आता विशाल वृक्ष झाला आहे. कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या जगभरातील अग्रगण्य स्टार्टअपमध्ये आज त्याची गणना होत आहे.गेल्या २५ वर्षांत रूट कॅपिटलने अशा आठशेहून अधिक कृषी उद्योग आणि २३ लाख शेतकऱ्यांना तब्बल दोन अब्ज डॉलरचे आर्थिक सहाय्य केले आहे. शेतकऱ्यांना वित्तपुरवठा करण्यासाठी रूट कॅपिटल खासगी देणगीदार आणि वित्तसंस्था या दोघांकडूनही निधी गोळा करते. या शेतकऱ्यांची प्रगती, रोजगारनिर्मिती, महिला सक्षमीकरण आणि त्यांचे जीवनमान सुधारण्यात या संस्थेने मोलाचा वाटा उचलला आहे.रूट कॅपिटलच्या रौप्य महोत्सवी वर्षात आम्ही दोन अब्ज डॉलर रकमेचा टप्पा गाठला ही विशेष बाब आहे, असे रूट कॅपिटलचे संस्थापक आणि सीईओ विली फूट म्हणतात. आमच्या शेतकरी सदस्यांनी केलेल्या कठोर परिश्रमांमुळे हे साध्य झाले. त्यांच्याशी भागीदारी करण्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. ग्रामीण भागातील समृद्धी वाढवण्याच्या आणि जगभरातील शेतकरी कुटुंबांच्या जीवनात चैतन्य आणण्याच्या आमच्या ध्येयाप्रती आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत.रूट कॅपिटल ही मदत १. वित्तपुरवठा, २. सल्ला आणि ३. प्रोत्साहन अशा तीन प्रकारे करते. खेडेगावांतील छोट्या व्यवसायांना अल्पकालीन आणि दीर्घकालीन कर्जाद्वारा वित्तपुरवठा केला जातो. या कर्जाचा योग्य विनिमय कसा करावा याचे शेतकऱ्यांना आर्थिक प्रशिक्षण दिले जाते. तसेच जास्तीत जास्त नफा कमावता यावा म्हणून शेतीच्या नवनवीन पद्धती अमलात आणण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले जाते.स्त्रियांचा शेतीतील सहभाग वाढवा यासाठी रूट कॅपिटलने २०१२मध्ये महिला कृषी उपक्रम सुरू केला. या उपक्रमांतर्गत संस्थेने महिलांनी सुरू केलेल्या उद्योगांमध्ये खास गुंतवणूक आणि त्यांना प्रशिक्षण देणे सुरू केले. त्यासाठी या व्यवसायांमध्ये ३० टक्के महिला शेतकरी आणि कर्मचाऱ्यांचा सहभाग बंधनकारक करण्यात आला. या प्रयोग एवढा यशस्वी झाला की रूट कॅपिटलच्या गुंतवणुकीतील अशा व्यवसायांची संख्या आता ५० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे.

रूट कॅपिटल ही आफ्रिका, दक्षिण अमेरिका आणि आशियातील प्रामुख्याने कॉफी उत्पादक शेतकऱ्यांसाठी काम करते. संस्थेने गुंतवणूक केलेले उद्योग या शेतकऱ्यांनी पिकवलेली कॉफी, कोको, मॅकाडेमिया नट्स, काजू, धान्य आदी उत्पादने खरेदी करतात. या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी आणि त्यांचा पुरवठा सुरळीत असावा यासाठी रूट कॅपिटलने केयुरिग डॉ पेपर, स्टारबक्स, वॉलमार्ट आणि आयकिया फाऊंडेशन अशा बड्या कंपन्यांशी करार केला आहे.आपल्या पिकांना अपेक्षित बाजारपेठ आणि योग्य मूल्य न मिळाल्यामुळे छोट्या ग्रामीण शेतकऱ्यांना त्यांची उत्पादने कमी किमतीत विकणे भाग पडते आणि त्यामुळे ते गरिबीच्या चक्रात खोल अडकत जातात. त्यांची ही अडचण दूर करण्याचे आणि त्यांना समृद्धीचा मार्ग दाखवण्याचे श्रेय निर्विवादरीत्या रूट कॅपिटलला जाते.

# पवित्र रमजानमध्ये उपवास ठेवून पुण्य कमवण्याचा महिना-तहसीलदार शेळके

**बीड । प्रतिनीधी**

मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान पर्वास शनिवार (१ मार्च) पासून प्रारंभ झाला आहे. भारतात रविवारी (२ मार्च) पहिला रोजा ठेवला गेला. इस्लाम धर्मात पवित्र 'रमजान'ला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात अल्लाहची विशेष इबादत (उपासना) केली जाते मुस्लिम बांधवांकडून निरंकार रोजे (उपवास) पाळले जातात. रोजाबरोबरच नमाज, कुराण पठण, विशेष प्रार्थना (तराविह) आदींमार्फत अल्लाहची इबादत केली जाते. मुस्लिम धर्मामध्ये चांगल्या व्यक्तीला उत्तमरीत्या परिभाषित करण्यात आले आहे. यासाठी मुस्लिम असणेच पुरेसे नाही तर मुलभूत पाच कर्तव्यांचे पालन करणे आवश्यक आहे. पहिले इमान, दुसरे नमाज़, तिसरे रोज़ा, चौथे हज आणि पाचवे जकात. इस्लाममध्ये सांगण्यात आलेले हे पाच कर्तव्य इस्लाम मानणाऱ्या व्यक्तीकडून प्रेम, सहानुभूती, मदत आणि आपलेपणाची इच्छा बाळगतात. 'रमज़ान' मांगल्याचे प्रतिक आहे. त्यामुळे याला कृपाप्रसादाचा महिनाही म्हणतात. पवित्र कुराणाचे अवतरण याच महिन्यातील एका रात्री झाल्याने ही रात्र हजार रात्रींपेक्षा वरचढ ठरली आहे. रमजानमध्ये रोजे म्हणजे उपवास अनिवार्य आहेत. या रात्रीत जास्त नमाज अदा करणे म्हणजे अल्लाहच्या समीप जाणे होय. नफील नमाजचा (जादा नमाज) मोबदला फ़र्ज़ (अनिवार्य नमाज़) इतका दिला जातो तर फर्ज (अनिवार्य) नमाजचा मोबदला सत्तर पटीने जास्त असतो.



**रोजाचा मूळ उद्देश**

रमजानमध्ये रोजा या शब्दाला अरबी भाषेत सोम म्हणतात, याचा अर्थ होतो थांबणे. रमजानच्या पवित्र महिन्यात सर्व दिवस 'रोजा' (उपवास) करणारे सर्व 'रोजेदार' दिवसभर अन्नपाणी घेत नाहीत. यासाठी शारीरिक आणि मानसिक संयमाची फार आवश्यकता असते. त्यामुळे आपल्या इंद्रियांना आणि मनाला एक शुचिर्भुत वळण लाभतं. मन एकाग्र करायला सुद्धा याचा फार उपयोग होतो. त्याचप्रमाणे इबादत (उपासना) करण्यासाठीसुद्धा योग्य पार्श्वभूमी व मानसिकता निर्माण होते. संपूर्ण रमजान महिना हा जणू उपासनामय, प्रार्थनामय आणि भक्तिमय झालेला असतो.

**रमजान महिन्याचे तीन हिस्से**




रमजान इस्लामी दिनदर्शिकेनुसार नववा महिना असतो. रमजान महिन्याचा पहिला दशक 'कृपेचा', दुसरा दशक 'क्षमेचा', तिसरा आणि अंतिम दशक नरकापासून 'मुक्ततेचा' मानला जातो. या काळात अल्लाह त्यास क्षमादान देईल व नरकापासून सुटका करून मुक्ती देईल. त्यामुळे वर्षभरातील अन्य अकरा महिन्यांत मिळणाऱ्या नेकी (पुण्याई) पेक्षा रमजानमध्ये मिळणारी नेकी ही तब्बल सत्तर पटीने जास्त असते. त्यामुळे मुस्लिम बांधव जास्तीत जास्त नेकी कमविण्यासाठी पवित्र रमजान महिन्यात संसार, व्यापार आदींचा त्याग करून अल्लाहास शरण जातात.

**पहिली ईद**

जंग-ए-बदरची लढाई जिंकल्यानंतर खुद्द मोहम्मद पैगंबरांनी त्यांच्या अनुयायांसह पहिली ईद-ऊल-फित्र साजरी केली होती. पवित्र कुरान याच महिन्यात अवरतले असल्यामळे इस्लाममध्ये रमजानला अनन्यसाधारण महत्व आहे. शिरखुर्म्या खास जेवण ईदच्या दिवशी सकाळी नमाज अदा झाल्यानंतर पहिल्यांदा दहीभात आणि साखरेचे जेवण होते. त्याचवेळी खजूर खाण्याचीही पद्धत होती. कारण मोहम्मद पैगंबर व त्यांच्या कुटुंबातील लोकांना हाच पदार्थ उपलब्ध होता, अशी समजूत आहे. दुधात शेवया टाकून खीर खाण्याची व इतरांना देण्याची पद्धत आहे. यावेळी मिठाई व शिरखुर्मा हे पदार्थ आवर्जून दिले जातात.

**का साजरी केली जाते रमजान ईद**

रमजान म्हणजे बरकत आणि ईद म्हणजे आनंद. परस्परांमध्ये स्नेहभाव वाढविणारा हा महिना रमजान ईद या दिवसाला ईद उल फित्र असेही म्हणतात. हा महिना व हा दिवस मुस्लिम धर्मियांसाठी अत्यंत पवित्र व मंगलमय असा मानला जातो. इस्लामिक दिनदर्शिकेनुसार मुस्लिम बांधव रमजानच्या महिन्यात २९ किंवा ३० दिवसांचा रोजा ठेवतात. त्यानंतर शव्वालच्या पहिल्या तारखेला ईद-उल-फित्र म्हणजे ईद ही चंद्रदर्शनाने साजरी केली जाते. ईदच्या दिवशी मुस्लिम बांधव महिनाभराचे उपवास करण्याची ताकद दिल्याबद्दल अल्लाहचे आभार मानतात. रमजानमध्ये जकात म्हणून गरिबांना मदत केली जाते व दानधर्म केला जातो, अशा या पवित्र रमजान महिन्याच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा ! .

# कांचन वाघमारे यांची राज्यस्तरीय महिलारत्न पुरस्कारासाठी निवड

**लातूर । प्रतिनिधी**

राज्यातील सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक साहित्यिक पत्रकारिता राजकीय वैद्यकीय, क्रिडा, कायदेशीर क्षेत्रातील कार्य करणाऱ्या महिला गौरव, सन्मान, मंत्रालय वार्ता चे मुख्य संपादक. अनिल अहिरे यांनी राज्यस्तरीय महिला रत्न पुरस्कारासाठी कांचन वाघमारे यांची निवड करण्यात आली

राज्यात मुंबई विभाग, खान्देश विभाग , उत्तर महाराष्ट्र विभाग, विदर्भ विभाग आणि मराठवाडा विभाग असे आठ विभागातून सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या रणरागिणी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या माध्यमातून राज्यात सामाजिक, महिलांना नेहमीच सहकार्य करण्यासाठी अहोरात्र मेहनत आणि जिद्दीने अनेक वर्षांपासून सातत्याने



कार्याची दखल घेतली. मंत्रालय वार्ता वृत्तपत्राचे संपादकांनी सौ. कांचन वाघमारे यांना राज्यस्तरीय महिला रत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. सौ. वाघमारे यांना ४ मार्च रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर सभागृह, मंत्रालयाच्या समोर नरिमन पॉईंट मुंबई येथे देण्यात येणार आहे. मंत्रालय वार्ता वृत्तपत्राचे संपादक. अशोक अहिरे यांनी पुरस्कार स्वीकारासाठी उपस्थित राहावे असे प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविले आहे. अनिल अहिरे मुख्य संपादक- मंत्रालय वार्ता , वृत्तपत्राच्या माध्यमातून राज्यातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, पत्रकारिता, सहकार, वैद्यकीय, राजकिय, आर्थिक क्रिडा क्षेत्रातील राज्यस्तरीय महिला रत्न पुरस्कारांची घोषणा-२०२५ करण्यात आली. . सौ. वाघमारे यांना राज्यस्तरीय महिला रत्न पुरस्कारासाठी निवड झाल्यानंतर मराठवाडा विभागातील सर्व जिल्हातील व तालुक्यातील स्तरावर अभिनंदन होत आहे.

# आदिवासी कातकरी मुला मुलींची अनुदानित आश्रमशाळा बाबरेच्या मुलींचे सुयश

**मुंबई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मागासवर्गीय समाज प्रबोधन संस्था संचलित आदिवासी कातकरी मुला मुलींची अनुदानित आश्रमशाळा बाबरे, ता. शहापूर या आश्रमशाळेतील विद्यार्थीनी कुमारी रोहिणी जाधव व कुमारी गौरी पारधी या मुलींनी स्नेहश्री फाउंडेशन या संस्थेमार्फत आयोजित केलेल्या राज्यस्तरीय संविधान प्रास्ताविका पाठांतर स्पर्धेमध्ये यश मिळविले. प्रित्यर्थ महाराष्ट्र राज्याचे समाजकल्याण मंत्री संजय

शिरसाट यांच्या हस्ते शिवसेना भवन येथे सत्कार करण्यात आला.महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्रालयाचे प्रधान सचिव विजय वाघमारे व उपसचिव रविंद्र



जाधव यांना आदर्श कृतिशील मुख्याध्यापिका आशा नवनाथ रणखांबे यांनी विद्यार्थिनी समवेत भेटून शाळेची माहिती दिली. विशेष म्हणजे यांच्या पहिल्या पिढीने पुस्तकाला हात लावला आहे. आजही त्यांचे पालक विटभट्टीवर काम करीत आहेत. आम्हाला आय. ए. एस आय. पी. एस व्हायचे आहे अशी महत्वकांक्षाही व्यक्त केली. या दोन्ही विद्यार्थिनींचे सचिवांनी कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष समीर सीताराम गायकवाड यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिका संघटित व्हा व संघर्ष करा ! हा ध्यास आहे व त्याचे हे यश आहे असे सांगितले.

# निवडणुकीत पडलो असतो तरी जनतेच्या मनातून पडलो नाही-बदामराव पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत माझा पराभव झाला असला तरी, जनतेच्या मनातून मी पडलेलो नाही. याचा मला अभिमान आहे. गोरगरीब आणि सामान्य लोकांचे आशीर्वाद कायम माझ्या पाठीमागे आहेत. म्हणूनच ७३ हजारांपेक्षा अधिक मते मला मिळाली. सर्वांसाठी मी खंबीरपणे उभा आहे. कोणतेही काम घेऊन या, ते करण्यासाठी तत्पर आहे. मी खचलो नाही, खचणार नाही. तुम्हीही कोणी खचू नका. नव्या ताकतीने कामाला लागा. येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर पालिका निवडणुकीत आपल्या विचाराचे उमेदवार निवडून द्या असे आवाहन शिवसेनेचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.

गेवराई तालुक्यातील पांढरी येथे दिनांक एक मार्च २०२५ रोजी एक कोटी ६१ लक्ष २५ हजार रुपयांच्या विविध योजना अंतर्गत कामाचा शुभारंभ प्रसंगी उद्घाटक म्हणून बदामराव पंडित बोलत होते. याप्रसंगी माजी सभापती पंढरीनाथ लगड, माजी जि प सदस्य युवराज डोंगरे, युवा नेते रोहित पंडित, युवा नेते यशराज पंडित, माजी सभापती गीताराम डोंगरे, गोविंद जोशी, राजाभाऊ खिस्ते, सुंदर तिवारी, राजाभाऊ विटेकर, केशव तिवारी, सरपंच भास्करराव हातागळे, सरपंच सर्जेराव कांबळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, नारायण गाडे, भाऊसाहेब माखले, भागवत नाटकर, बंटी भामरे, सरपंच परशुराम मिंड, संतोष हातागळे, खदिरभाई आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी पोलीस विभागात निवड झालेल्या विश्वजीत कांबळे यांचा सत्कार बदामराव पंडित यांनी केला.

पुढे बोलताना ते म्हणाले की, विधानसभेत लागलेल्या निकालाने राज्यातले मतदार अचंबी झाले आहे जे




निवडून आले त्यांनाही धक्के बसले आहेत. त्यामुळेच गेवराई मतदार संघसह राज्यातल्या बहुतांश मतदारसंघात जल्लोष आणि आनंद साजरा करताना मतदार दिसले नाहीत. मी प्रामाणिकपणे गोरगरिबांची आणि गेवराई मतदारसंघातल्या लोकांची कामे करत आलेलो आहे. या पुढच्या काळातही त्याच पद्धतीने कामे करत राहणार आहे. निवडणुकीत आपण पडलो असलो तरी जनतेच्या मनातून पडलेलो नाहीत त्यामुळे कोणी खचून जायचं नाही. ताकतीने कामाला लागा. आलेल्या प्रत्येक माणसाचं काम करा. ज्यांची कामे तुमच्याकडून होणार नाहीत ती माझ्यापर्यंत घेऊन या. गोरगरिबांचा माझ्यावर विश्वास असल्याने त्यांच्या आपल्याकडून अपेक्षा आहेत, असं सांगून कोणाचेही काम अडू देणार नाही. कोणी अडवण्याचा प्रयत्न केला तर माझ्याशी गाठ आहे, असा इशाराही बदामराव पंडित यांनी यावेळी दिला.


युवा नेते रोहित पंडित, पंढरीनाथ लगड, युवराज डोंगरे, नारायण गाडे, सुंदर तिवारी यांची समायोचित भाषणे झाली. याप्रसंगी शिवाजी आखरे, बाबुराव खांडे, राजेंद्र निकम, दिलीप पवार, पांडुरंग नलावडे, परमेश्वर परदेशी, किशोर इंगोले, बाबूप्रसाद परदेशी, संतराम निकम, सुभाष साखरे, विशाल आखरे, विष्णू कांबळे, दिलीप निकम, जीवन पांडे, सिताराम कांबळे, सचिन आखरे, भगवान राऊ आदींसह पंचक्रोशीतील अनेक गावचे आणि पांढरी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विमा कंपनी तयार...मात्र शासनाने जबाबदारी झटकली

# खरिपाच्या पीकविम्यासाठी किसान सभेचे लोकप्रतिनिधींना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

खरीप २०२४ हंगामातील नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर पीक विमा मिळावा याकरिता अखिल भारतीय किसान सभेकडून मागील महिन्यात विमा कंपनी कार्यलयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते.खरीप २४ मधील पीक विमा बाबत शासन हिस्सा विमा कंपनीला न दिल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याची ४ महिन्या पासून प्रतीक्षा करावी लागत असल्याची बाब समोर आली. लवकरात लवकर शासन हिस्सा विमा कंपनीला देय करून शेतकऱ्यांना विमा मिळेल असे आश्वासन शासन प्रतिनिधी, विमा कंपनी आणि लोक प्रतिनिधी मार्फत लेखी स्वरूपात मिळाल्याने हे बेमुदत धरणे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. मात्र अद्याप ही शासन आपली जवाबदारी स्वीकारण्यास तयार नसल्याने किसान सभेने जिल्ह्यातील लोक प्रतिनिधीला या प्रश्नाबाबत अवगत करण्याची भूमिका घेतली आहे.याचाच भाग म्हणून आ.विजयसिंह पंडित, आ.नमिता मुंदडा यांना या बाबत निवेदन देण्यात आली.



मागील महिन्यात दि १७ फेब्रुवारी रोजी ॲग्रीकल्चर पिकविमा कंपनीच्या दारात दोन वर्षांपूर्वीच्या मंजूर असलेल्या २०२३-२०२४ खरीप व रब्बी हंगामाचा पिकविमा अजून देखील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केलेला नसल्यामुळे बेमुदत धरणे धरण्यात आले होते. त्या धरणे आंदोलनातील चर्चेत पिकविमा कंपनीकडून दखल घेऊन २०२३ खरीप प्रलंबित पिक विमा वाटप चालू आहे परंतु २०२४ चा पिक विमा वाटण्यासंदर्भात सरकारचा प्रीमियम वाटा (हिस्सा) कंपनीला न दिल्याचे सांगण्यात आल्याने संतप्त शेतकऱ्यांचा धरणे आंदोलनाचा निर्धार अधिक घट्ट झाला होता.परंतू प्रशासनाचे प्रतिनिधी, विमा कंपनीचे अधिकारी आणि सरकारचे प्रतिनिधी म्हणून आमदार सुरेश धस यांनी आंदोलनाला भेट देऊन मुख्यमंत्री, अर्थमंत्री आणि कृषिमंत्री यांच्याशी बोलून ताबडतोब सरकारचा प्रीमियम देण्यासंदर्भात कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते व विमा कंपनीने २०२३ चा विमा फेब्रुवारी अखेरपर्यंत वाटण्यासंदर्भात लेखी आश्वासनानंतर किसान सभेच्या बेमुदत धरणे आंदोलनास स्थगिती देण्यात आली होती.परंतू फेब्रुवारी मावळून मार्च महिना उजडला तरी सुद्धा सरकार आणि कंपनी यांच्या गोंधळात शेतकऱ्यांच्या खात्यात पैश्याचा संदेश काही मिळेना म्हणून आत्ता किसान सभेने जिल्ह्यातील सर्वच लोकप्रतिनिधीशी भेटून या प्रश्नावर विधानसभेत आवाज उठवून हक्काचे शेतकऱ्यांचे पैशे तात्काळ वितरित करण्यासाठी सरकारला भाग पाडावे म्हणून निवेदन देण्यात येत आहेत. आ.विजय सिंह पंडित, आ. नमिता मुंदडा यांना भेटून चर्चा करून निवेदन देण्यात आले याप्रसंगी कॉ भगवान बडे, भानुदास बाप्पा देशमुख, कॉ.विनायक राजमाने, कॉ.देविदास जाधव, कॉ.सिताराम सोळंके, कॉ.राऊत उपस्थित होते.बीड जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधीला निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या हक्काची उधारी मागण्यासाठी किसान सभा शेतकऱ्यांची वसुली अधिकारी या भूमिकेनेच उतरली आहे.

**बीड जिल्ह्यातील शेतकरी आणि तरुण शेतकरीपुत्रांचा अक्षरशः संयमाचा करूण अंत सरकार पहात आहे. दोन-दोन वर्ष जर नुकसान होऊन मंजूर पैसे थकवली जात असतील तर शेतकऱ्यांनी खत,बियाणं कसे खरेदी करावे.? हे कसले शेतकऱ्यांचे सरकार.? हे तर कंपनीचे सरकार भासू लागले आहे. आत्ता आम्ही कंबर कसून लोकप्रतिनिधीसोबत चर्चा करून त्यांना या प्रश्नावर बोलण्यास भाग पाडणार आहोत.आम्ही आमची उधारी घेतल्याशिवाय थांबणार नाही**
**-कॉ. अजय बुरांडे, किसान सभा, बीड**

# जलसंपदा विभागाच्या बैठकीत सिंचनाच्या प्रमुख मागण्याकडे वेधले लक्ष

**छ. संभाजीनगर । विष्णु हनवते**

जलसंपदा विभागाच्या ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प , विष्णुपुरी प्रकल्प , पूर्णा प्रकल्प कालवा सल्लागार समितीची बैठक छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत मी डेरला, विष्णुपुरी प्रकल्प,पैनगंगा नदीपात्रात सोडण्यात येणारे पाणी, येलदरी कालवा आणि हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष याबाबत प्रश्न उपस्थित करून तात्काळ हे पूर्ण करावेत अशी मागणी केली.

नांदेड जिल्ह्यातील डेरला लिफ्ट प्रकल्पासाठी १२ वर्षांपूर्वी ७५ कोटी रूपये खर्च केले व कंत्राटदराने सर्व पैसे उचलून घेतले पण अद्याप पर्यंत या भागातील शेतकऱ्यांना पाण्याचा एक थेंबही मिळालेला नाही. याबाबत प्रश्न उपस्थित करून मंत्री महोदयांचे लक्ष वेधले.तसेच विष्णुपुरी प्रकल्पलातून शेतकऱ्यांना शेतीसाठी चार वेळा पाणी सोडण्यात यावे. पैनगंगा नदीमध्ये पिण्याच्या पाण्याची यापूर्वी करण्यात आलेली तरतूद अपुरी आहे. उन्हाळ्यात नदी काठच्या गावांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागते त्यामुळे हि पाण्याची तरतूद आता १.२५ वरून २ टीएमसी करण्यात यावी. व फेब्रुवारी व मे महिन्यात उनकेश्वर पर्यंत पाणी सोडण्यात यावे.


पैनगंगा नदीवर मंजूर झालेले सात बंधारे लवकरात लवकर पूर्ण करावेत. अशी मागणी केल्यांनतर मा. मंत्री महोदय ना. श्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी हि मागणी मान्य करत हे सात हि बंधारे येत्या २ वर्षात पूर्ण करून यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही असे ते म्हणाले. हिंगोली जिल्ह्यातील येलदरी धरणातून कालवा काढुन जास्तीत जास्त लाभ हा हिंगोली , सेनगाव तालुक्यांना व्हावा यासाठी मंजुरी देण्यात आली होती. आणि याबाबतचे जे सर्वेक्षण करण्यात येणार होते ते पूर्ण करण्यात यावेत.तसेच हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी मंजूर करण्यात आलेले ३०० कोटी रुपये तात्काळ देण्यात यावेत. पैनगंगा नदीतून जाणाऱ्या डाव्या व उजव्या कालव्यांची दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी.




# पत्रकार लक्ष्मण माघाडे यांना समाज भूषण जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

गंगापूर तालुक्यातील भिमनगर बाभुळगाव नांगरे येथे त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती मोठ्या उत्साहात दिनांक २८ फेब्रुवारी शुक्रवार रोजी सकाळी अकरा वाजता जिवन सहारा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या विद्यमानेसाजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती संभाजीनगर तालुका ,कन्नड, वैजापूर, गंगापूर या तालुक्यातील विविध क्षेत्रात सामाजिक, राजकीय, धार्मिक कार्य करणाऱ्या चाळीस समाज सेवकांना समाज भूषण जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.या वेळी पुज्य.भदंत विधुर व भंते प्रज्ञाशिल पाणपोई कन्नड यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रा. डॉ.ऋषिकेश कांबळे जेष्ठ साहित्यीक, विचारवंत ,समीक्षक व प्रसिद्ध व्याख्याते प्राध्यापक अनिल कांबळे, आयुष्यमती मीनाक्षी जाधव बार्टी पुणे यांच्या शुभहस्ते ४० समाज सेवकांना समाज भूषण जिवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.या मध्ये गंगापूर शहर येथून आयु.लक्ष्मण माघाडे यांनी सामाजिक,धार्मिक,भीम कवी, गायनातून समाज प्रबोधन,एस. टी.महामंडळ मध्ये केलेल्या कार्याची व पत्रकारिते मधून अन्यायाविरुद्ध घेतलेल्या लेखणीची दखल घेऊन त्यांना समाज भूषण जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. या निवडी बद्दल नातेवाईक,मित्रमंडळी व गंगापूर परिसरातील अनेकांनी प्रत्यक्ष भेटून व मोबाईल द्वारे शुभेच्छा देऊन व पुढील कार्यासाठी हार्दिक अभिनंदन केले.या कार्यक्रमाचे सुत्र संचालन बाबासाहेब जाधव व विनोद बागुल यांनी केले तर अध्यक्ष बाबासाहेब भिकाजी सोनवणे, सचिव प्रकाश दिवेकर, उपाध्यक्ष दादासाहेब त्रिभुवन, सल्लागार सुभाष थोरात, सह सल्लागार दारासिंग चाबुकस्वार यांनी सर्वांचे आभार मानले.





# धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान ची बैठक संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

गाव देवठाणा तालुका धारूर जिल्हा बीड येथे धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व मराठवाडा संपर्क प्रमुख आण्णासाहेब जाधव यांच्या नेतृत्वाखाली बैठक संपन्न होऊन सामाजिक, मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली यावेळी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान च्या माध्यमातून होत असलेल्या मागेल त्याला शिवस्मारक कार्याचा आढावा घेतला यावेळी गावातील मित्र मंडळी भागवत सोळंके, पुरुषोत्तम सोळंके, दीपक सोळंके ,विनायक सोळंके ,मधुकर सोळंके ,गणेश सोळंके ,जिजा काशीद , राजेभाऊ सोळंके, नामदेव सोळंके ,सतीश सोळंके ,अतुल सोळंके, सूर्यकांत सोळंके,संदीप सोळंके ,विवेक सोळंके , महादेव सोळंके , अजय सोळंके सह गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते

# महाबोधी महाविहार मुक्तीसाठी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत महामहीम राष्ट्रपती यांना निवेदन



**बीड । प्रतिनिधी**

महाबोधी महाविहार मुक्तीसाठी बोधगया हे बौद्धांचे पवित्र स्थान आहे. हे बौद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात मिळावे म्हणून,येथे मोठ्या संख्येने उपोषण करणारे पुज्य भंते गन आणि बौद्ध उपासक- उपासिका यांना पाठिंबा म्हणून दि. २८/०२/२०२५ रोजी पुज्य भंते आचलानंदजी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच यु.एस वाघमारे,पी.व्ही बनसोडे,अशोक ठोकळ यांच्या प्रमुख उपस्थितीत महाबोधी महाविहार साठीचा बुद्धगया मंदिर अधिनियम १९४९ रद्द करून सदर बुद्धविहार बौद्धाच्या ताब्यात व्यवस्थापन देण्यात यावे याची आग्रही न्याय मागणी साठी जिल्हाधिकारी बीड यांचे मार्फत बीड शहरातील बुद्ध विहार परिसरातील ७६४ उपासक-उपासिका तसेच सामाजिक संघटना आंबेडकर अनुयायी यांच्या सह्यांचे निवेदन भारताचे महामहिम राष्ट्रपती,पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री मुख्यमंत्री बिहार राज्य मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना देण्यात आले.

## पुण्यातील बसमध्ये बलात्काराची धक्कादायक घटना

# जमात-ए-इस्लामी हिंदने त्वरित न्याय आणि समाजाच्या आत्मपरिक्षणाची केली मागणी

**परळी । प्रतिनिधी**

जमात-ए-इस्लामी हिंद (जेआयएच) महाराष्ट्रचे अध्यक्ष मौलाना इलियास खान फलाही यांनी पुण्यातील एसटी बसमध्ये घडलेल्या धक्कादायक बलात्काराच्या घटनेबाबत तीव्र संताप आणि वेदना व्यक्त केल्या असून, पीडितेला त्वरित न्याय मिळावा अशी मागणी केली आहे.

माध्यमांना दिलेल्या निवेदनात जमात-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्रचे अध्यक्ष म्हणाले, पुण्यातील बस डेपोमध्ये एसटी बसमध्ये घडलेल्या या अमानवी कृत्याने आम्ही अत्यंत व्यथित आहोत. जमात-ए-इस्लामी हिंद, महाराष्ट्र, पीडित आणि तिच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असून, तिच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करते. आम्ही पुणे पोलिसांचे त्वरित कारवाई करत आरोपीला ओळखून अटक केल्याबद्दल कौतुक करतो.



कायदा आणि न्याय यंत्रणांनी या प्रकरणाचा जलदगतीने तपास करून दोषीला कठोर शिक्षा द्यावी, जेणेकरून अशा गुन्ह्यांना रोखण्यासाठी समाजात कडक संदेश जाईल.मौलाना इलियास खान पुढे म्हणाले, हा अमानवी प्रकार आपल्या समाजातील नैतिक अधःपतनाचे गंभीर प्रतिबिंब आहे. अशा गुन्ह्यांचे मुळ कारण शोधून सुरक्षिततेसाठी व्यापक उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. लैंगिक गुन्ह्यांमध्ये वाढ ही अश्लीलतेच्या बेमालूम प्रसाराचा, नैतिकतेच्या ऱ्हासाचा आणि तरुणांमध्ये नैतिक शिक्षणाच्या अभावाचा परिणाम आहे. जमात-ए-इस्लामी हिंद नेहमीच महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांना रोखण्यासाठी सर्वसमावेशक उपायांचा आग्रह धरत आली आहे - कठोर कायदे, प्रभावी अंमलबजावणी, माध्यमांची जबाबदारी आणि नैतिक शिक्षण यांचा समावेश असलेली व्यापक भूमिका स्वीकारली पाहिजे. सर्व धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांनी एकत्रितपणे महिलांच्या सन्मान आणि सुरक्षिततेसाठी काम करावे.

# अन्नत्याग आंदोलनात किसानपुत्रांनी सहभाग घ्यावा-अमर हबीबांचे आवाहन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

या वर्षीही शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहडत म्हणून किसानपुत्र आंदोलनच्या वतीने १९ मार्च रोजी करण्यात येणाऱ्या अन्नत्याग आंदोलनात किसानपुत्रांनी अधिकाधिक सहभागी व्हावे, असे आवाहन किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांनी केले. किसानपुत्र आंदोलनच्या वतीने अंबाजोगाई येथे १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलना निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत अमर हबीब बोलत होते.

अमर हबीब पुढे म्हणाले की, देशातील ९० टक्के लोक शेतीवर अवलंबून असतांनापासुन शेतकरी आत्महत्या सुरु आहेत. तेंव्हापासून आजपर्यंत आर्थिक विवंचनेतून शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. आज शेतीवर अवलंबून असलेल्या शेतक-यांचे प्रमाण ९० टक्क्यांवरुन दहा ते पंधरा टक्क्यांवर आले आहे, मात्र शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण काही कमी झाले नाही, हे भीषण वास्तव चित्र आहे.

किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी मागील नऊ वर्षांपासून किसानपुत्र आंदोलन १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलन राबवित आहे. अंबाजोगाई येथे हा उपक्रम गेली आठ वर्षांपासून अतिशय चांगल्या पद्धतीने सुरु असून यावर्षी स्थानिक संयोजन समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांत किसानपुत्रांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अमर हबीब यांनी केले. दि.१९ मार्च रोजी



सकाळी सामुहिक उपवास, सहवेदना रॅली, शेतकरी सहवेदना पुरस्कार, आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींचा साडीचोळी देऊन सन्मान,शेतकरी आत्महत्या कारणे आणि मिमांसा या विषयावरील व्याख्यान आणि सामुहिक उपवास सोडण्याचा कार्यक्रम यांच्या संपुर्ण नियोजनाची माहिती दिली. या कार्यक्रमात अंबाजोगाई तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील बहिणींचा सहभाग जास्तीत जास्त कसा करुन घेता येईल यासाठी ॲड. संतोष पवार यांनी माहिती दिली तर आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणीच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन संबंधीची माहिती शेतकरी संघटनेचे नेते कालिदास आपेट यांनी दिली. या बैठकीत अच्चुत बापु गंगणे, वसंतराव मोरे, अनिता कांबळे, अनिरुद्ध चौसाळकर, प्रा. शांती नाथ बनसोडे, मदन परदेशी, महावीर भगरे यांनी उपयुक्त सूचना केल्या. पत्रकार कक्ष येथे आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस अमर हबीब, कालिदास आपेट, प्रा. शांतिनाथ बनसोडे, मुजीब काजी, अनिरुद्ध चौसाळकर, अच्चूत गंगणे, मदन परदेशी, संतोष बोबडे महावीर भगरे, व्यंकटेश जोशी, वसंत मोरे, इस्माईल शेख, लखन होके, कल्याणराव भगत, रेखा देशमुख, किरण देशमुख, अनिता कांबळे, प्रतिभा अवचर, दत्तात्रय अंबेकर, ॲड. माणिकराव बावणे व इतर मान्यवर उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077